विश्वनाथ खैरे

# मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार

नव्या पिढीसाठी
भाषाप्रदूषण टाळून भाषाविकासाचा मार्ग

संमत

**नव्या पिढीसाठी संमत : १**

# मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार

डिसेंबर २००३

प्रकाशक
उमादेवी खैरे
संमत प्रकाशन, ३७४ सिंध सोसायटी, औंध पुणे ४११००७

मुद्रक
स्पायसर कॉलेज प्रेस औंध रोड, पुणे ४११००७

५ रु.

# भूमिका

भाषा, संस्कृती आणि पुराणकथा यांच्या संमत संशोधनाच्या तीन पुस्तकांची (*मराठी भाषेचे मूळ, अडगुलं मडगुलं, भारतीय मिथ्यांचा मागोवा)* दुसरी आवृत्ती गेल्या दोनतीन वर्षांत *नव्या पिढीसाठी* काढली. त्यांच्या भूमिकांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, अभ्यासक्रमात समावेश नसल्यामुळे नव्या पिढीतल्या अभ्यासकांना संमतविचाराचा किंवा त्याच्या उपयोजनाचा फारसा किंवा अजिबातच परिचय नाही. या संशोधनाचा परिघ किंवा आवाका व्यापक असल्यामुळेही अभ्यासक त्याच्या खनपटीला बसत नाहीत. निखळ संशोधन, भाषाविकास, संस्कृतीचे आकलन आणि त्यातून समाजपरिवर्तनाचे दिशादर्शन या सर्व दृष्टींनी हा विचार नव्या पिढीपर्यंत पोचायला तर हवाच. यासाठी भूत-भविष्यांशी संधान राखणाऱ्या पण मर्यादित विषयांवर माफक किमतीच्या लहान पुस्तिका काढून नव्या पिढीपर्यंत त्या पोचवाव्यात असे ठरवले आहे.

त्यानुसार *नव्या पिढीसाठी संमत* या मालिकेची ही पहिली पुस्तिका प्रकाशित होत आहे.

मराठी ललित आणि वैचारिक साहित्यात इंग्रजीतून जसेच्या तसे किंवा अनुवादित रूपात पुष्कळ घेतले जात असते. ही घेवाण अपरिहार्यही आहे. ती व्यवस्थितपणे केली तर मराठीच्या विकासाला तिची मदतच होईल. त्या दिशेने विचार व्हावा या हेतूने वेळोवेळी लिहिलेले लेख या पुस्तिकेत एकत्र केले आहेत. तीन तपांवरच्या

काळात ते लिहिलेले असले तरी त्यांचे विचारसूत्र सलग आहे. त्यांमध्ये तात्त्विक विचार मांडून 'असे व्हावे, तसे करावे' असे सांगण्यापेक्षा या घेवाणीचे सध्याचे स्वरूप विचाराला घेऊन त्यावरून पुढे जाण्यासाठी व्यावहारिक विधायक सूचना केल्या आहेत. ललित, काव्य, विवेचक व संशोधन या सर्व प्रकारांचे लेखन करताना स्वतः त्या अनुसरल्या आहेत हे मुद्दाम नमूद करतो.

पहिल्या लेखात 'म.सा.पत्रिके'च्या एका अंकातले विविध लेख, साहित्यसंमेलन-अध्यक्षीय भाषण आणि समीक्षाविषयक ग्रंथ यांच्यातल्या इंग्रजीचा विचार केला आहे. शेवटी विधायक सूचना आहेत.

दुसऱ्या, दोन तपांपूर्वी 'सत्यकथे'त आलेल्या लेखात,इंग्रजी घुसडलेल्या ललित लेखनाचे काहीसे गंभीर विडंबन, दिशादर्शनासहित आहे.

तीन तपांपूर्वी 'माणूस'मधे आलेल्या तिसऱ्या लेखात थोडेफार चिमटे काढले असले तरी भाषांतराला भाषाशुद्धीचा जाच नसावा हे मुख्यतः मांडले आहे.

साहित्यसंस्था आणि त्यांचे पदस्थ यांनी यासारख्या चर्चेला अग्रक्रम दिला पाहिजे. दुर्दैवाने यासंबंधात त्यांची अनास्था अनुभवाला आली ती चौथ्या लेखात निवेदिली आहे. ही अनास्थेची स्थिती बदलण्याचे नव्या पिढीच्याच हाती आहे.

१६.१२.२००३

**विश्वनाथ खैरे**

# १

# मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार

एकोणिसाव्या शतकापासून मराठीवर इंग्रजीचा प्रभाव विशेषत्वाने पडू लागला. त्या काळातल्या साहित्याला 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' असे अभिधानच मिळाले आहे. या 'अवतारा'चा खास विशेष हा होता की त्यातली भाषा सरळ मराठी होती. इंग्रजीतले ज्ञान, संकल्पना, शब्द पचवून घेऊन मराठी वाचकाला समजेल अशा स्वरूपात लेखन करण्याची कसोशी त्याच्यामागे होती..

विसाव्या शतकातल्या स्वातंत्र्यचळवळीच्या काळात भाषाशुद्धीच्या आग्रहा-मुळे इंग्रजी शब्द लेखनात येऊ द्यायचे नाहीत असा कटाक्ष अनेकांनी पाळला. एकंदरीतच इंग्रजी अवतरणे किंवा शब्द मराठी लेखनात तुरळक दिसत.

स्वातंत्र्यानंतरच्या लेखनात हा कटाक्ष पुष्कळ कमी झाला. जगभरच इंग्रजीचा प्रभाव वाढल्यामुळे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीपोटी असंख्य नव्या शब्दांची भर जागतिक भाषाभांडारांमध्ये अव्याहत पडत राहिल्यामुळे, इंग्रजी शब्द आणि वाक्प्रयोग मराठीतही वाढत्या प्रमाणात येऊ लागले. त्यांचा रेटा थोपवणे कठीण किंबहुना अशक्य आहे. आता अगदी पहिलीपासूनच इंग्रजी शिकवायला सुरुवात झाल्यामुळे येत्या पिढ्या आणखीच इंग्रजी शब्द मराठीत वापरायला लागतील असे दिसते.

तरीसुद्धा निम्म्याहून अधिक मराठी जनता केवळ मराठी-साक्षरच राहणार आहे याचे भान ठेवून मराठी लेखनात येणाऱ्या इंग्रजी शब्द-प्रयोगांचे त्यांना समजेल असे काही अलिखित नियमन पाळणे जरूरीचे आहे. मराठीत विवेचक लेखन करणारांवर या बाबतीत विशेष जबाबदारी आहे.

आज या संदर्भात काय स्थिती आहे ? उदाहरणादाखल महाराष्ट्र साहित्य पत्रिका या वजनदार कालिकाच्या ऑक्टो-डिसे २००२ च्या अंकातले विवेचक लेख या अंगाने पाहिले, तर इंग्रजी शब्द-प्रयोगांविषयी लेखकांचे समान धोरण दिसत नाही. एकाच पानावरसुद्धा या वापराचे विविध प्रकार दिसून येतात. 'तंत्रज्ञानाला मराठी पेहेराव देणारा विद्योपासक : कॅप्टन जर्विस' याचे एकोणिसाव्या शतकातले विचार त्याच अंकात पृ. ७७ वर आले आहेत :

> हा गणितमार्ग महाराष्ट्रभाषेत दाखवतो, त्यात कित्येक पदार्थांची नावे या भाषेत अप्रसिद्ध आहेत. तेथे संस्कृत शब्द योजले आहेत. या मुलकाच्या भाषेत अनेक भाषांचे शब्द येतात. तरीही तेथे मराठीच शब्द वापरले आहेत.

जर्विस यांची ही कळकळ आपल्यालाही वाटली पाहिजे. *यासाठी विधायक विचाराची सुरवात व्हावी म्हणून* पत्रिकेतल्या लेखांमधली अवतरणे संक्षिप्त टीपांसह पुढे दिली आहेत. पृष्ठांचे संदर्भ प्रत्येक अवतरणाच्या सुरवातीला दिले आहेत. लेख-लेखकांच्या नावांचे येथे काही प्रयोजन नाही. मराठी जनतेला नवेनवे ज्ञान पुरवणारे मराठी लेखन प्रसिद्ध होत राहावे या दृष्टीने लेखकवाचकांनी त्यांचा विचार करावा.

४५. मूळद्रव्याच्या (रॉ मटेरिअलच्या)

- मराठी 'कच्चा माल' वापरला असता तर संस्कृत शब्द वापरून इंग्रजी शब्दांनी त्याचा अर्थ द्यावा लागला नसता.

५८. एक लांबलचक last journey सुरू झाला.

- मराठी लेखनात रोमन लिपीचा वापर टाळायला हवा. इंग्रजीपेक्षा 'अखेरचा प्रवास' सारखा मराठी शब्दप्रयोग अधिक उचित झाला असता.

६१. Novel साठी असणारे कादंबरी हे नाव.

- रोमन लिपी. 'नाव' आणि 'शब्द ' यांची गफलत.

६४. इंग्रजीतील मूळ Novel (नाविन्य कृती) या शब्दाला..

- कंसातला मराठी अर्थ ६१. वाक्यात यायला हवा होता.

६१. ज्याला इंग्रजीत sober history म्हणतात अशा 'निखळ' 'अस्सल' 'अ-संमिश्र' इतिहासासाठी...

- तीन मराठी शब्दांनी अपेक्षित गुणांची यादी केल्यामुळे रोमन लिपीतल्या आणि इंग्रजी शब्दांची गरज नव्हती.

६२. 'ऐतिह्य'..त्याचा अर्थ traditional instruction किंवा legendary account असा वा.शि. आपट्यांच्या कोशात दिला आहे.

- रोमन लिपीतील इंग्रजी शब्दप्रयोगांऐवजी त्यांचे मराठीत अर्थ नोंदावयास हवेत.

६२. निरनिराळ्या नऊ (nine) नंदांच्या याद्या ..

- साध्या मराठी शब्दासाठी इंग्रजी पर्याय, तोही रोमन लिपीत, कशाला ?

६२. ग्रांथिकसमीक्षेचा (Lower Criticism) तो एक उत्कर्ष बिन्दू .. यानंतर उच्चस्तरीय समीक्षेचे (Higher Criticism) निकष..

- इंग्रजी शब्दप्रयोग (आणि लिपी) वापरण्याने मराठी पर्यायशब्द मागे पडत राहतात आणि भाषेची वाढ होत नाही.

६४. प्रमाणाचा भेद त्यांना दोन वेगळ्या जातीच (categories) बहाल करतो.

६४. ..'वाक्य' म्हणजे sentence नाही; 'वाक्य' म्हणजे वचन, 'वाङ्मय'.

६४. संस्कृतात शोकांतिका (tragedies) नाहीत..

६५. 'बिम्बाख्यान' हे बखर (Chronicle) किंवा चरित्रग्रंथ (Historical Biography) या धर्तीचे असल्याचे..

- या चार वाक्यांतल्या परिचित मराठी शब्दांसाठी इंग्रजी मानदंडांची जरूर नव्हती. रोमन लिपीचा मुद्दा आहेच.

६४.शेक्सपिअरच्या शोकान्तिकेची magnitude (आकारिक भारदस्तपणा).

- असले इंग्रजी शब्द गाळले पाहिजेत. प्रस्तुत मराठी शब्दाने पुरेसा अर्थ व्यक्त होत नाही असे वाटल्यास आणखी शब्द वापरावेत.

७१.अँटोनियो ग्रामची याने मांडलेला हेजिमनीचा (Hegemony) सिद्धान्त.

- रोमन लिप्यंतर देऊन अधिक काही साधले नाही.

७१. 'हेजिमनी अथवा धुरीणत्त्व' म्हणजेच संमतीवर आधारलेल्या सत्तेची स्थापना आणि त्यासाठी करावे लागणारे बौद्धिक नेतृत्व.

- इंग्रजी शब्दाला सुचवलेला पर्याय आधीच्या अवतरणात यायला हवा होता. येथे या संज्ञेचे विवरण स्पष्ट नाही.

७१. एकंदरीत असे दिसते की, हेजिमनी म्हणजे खुशीने दिलेली संमती किंवा मान्यता...पहिला (मार्ग), तो गट लादत असलेल्या अन्यायाला सक्तीने सर्वांची संमती किंवा मान्यता मिळविणे... हेजिमनीतील दुसरा मार्ग खुशीच्या संमतीचा किंवा आपण होऊन दिल्या जाणाऱ्या मान्यतेचा.

७३. ..तिथे (साहित्यात) कलावादाने निर्माण केलेली हेजिमनी होती.

- एकदा 'धुरीणत्व (त्त्व नव्हे)' हा पर्याय स्वीकारल्यावर मूळ इंग्रजी शब्दाऐवजी तोच वापरीत राहिले पाहिजे, एरवी मराठीत नव्या संकल्पनांचे शब्द येणार कसे ? मराठी पर्यायाने क्रियापदात नपुसकलिंगी रूप आले असता. इंग्रजी शब्दाच्या ध्वनीमुळे स्त्रीलिंगी प्रयोग झाला. लेखनात अशा तपशिलांचाही विचार झाला पाहिजे.

७२. ही Counter hegemony ची म्हणजे मान्यताविरोधाची किंवा संमतीविरोधाची भूमिका होय.

- इंग्रजी शब्दाची गरज नव्हती. रोमन लिपीची त्याहून नव्हती.

७३. ते म्हणजे Counter Hegemony चेच दृश्यरूप होते.

७४. ..या साहित्याने .. Counter hegemony व्यक्त करणाऱ्या नवप्रवाहांची वाट खुली करून दिली..

७५. ..ज्यांच्या मुळाशी जीवनसंलग्न असे Counter hegemony चे सूत्र कार्यकारी झालेले दिसते..

- आधी वापरलेले मराठी पर्याय वापरायला हवे होते.

७४. ..'आता आणि इथे ' (Now &Here) आपल्या बेछूट कलाने शोध घेऊ पाहणारी ही विचारसरणी..

- इंग्रजी वाक्प्रयोगातला शब्दांचा क्रम उलटा आहे. त्याचा अर्थ 'सध्या, वर्तमानात' असा आहे. शब्दशः भाषांतराने नव्या वाक्प्रयोगाची मराठीत भर

घालायची असेल तर कंसात इंग्रजी पर्याय देणे टाळले पाहिजे.

७४. तशीच या विचारसरणीतील Alienation, Absurdity, Nothingness, Boredom ही सूत्रेही सर्वांना थबकवणारी ठरली.

- याप्रमाणे जाडे इंग्रजी शब्द घडघडा उतरून दाखवणे अक्षम्य आहे. ऐकणाराला किंवा वाचणाराला हे केवळ विद्वत्ताप्रदर्शन वाटले तर त्याला दोष देता येणार नाही.

७४. इथला नायक.. इथे चक्क inactive किंवा ब..सारखा अनाकर्षक झालेला दिसत होता.

- इतका साध्या अर्थाचा इंग्रजी शब्द रोमन लिपीत वापरण्यात चक्क बौद्धिक निष्क्रियता दिसते.

८२. पण Introduction to textual critisim सारखा स्वतंत्र ग्रंथ मराठीत नव्हता.

- यातल्या महत्त्वाच्या शब्दात स्पेलिंगची चूक आहे. हे विषयाचे वर्णन आहे की ग्रंथाचे नाव आहे याचा बोध होत नाही.

८३. वनस्पतींना कार्बन मोनॉक्साईड शोषून घेता येत नाही. हवेतील कार्बन डाय ऑक्साईड मात्र त्या शोषून घेतात.

- यांतली रसायनपरिभाषेतली वायूंची नावे नागरी लिपीत लिहिली ते ठीक आहे. मात्र या शब्दांचे घटक तोडून लिहायचे का जोडून याचे धोरण ठरले पाहिजे.

९८. ही लोकगीते म्हणजे Cream of Society याचा प्रत्यय येतो.

- इंग्रजी वाक्प्रयोग (रोमन लिपीत!) अगदी चुकीच्या अर्थाने वापरला आहे.

## १.२ : साहित्यसंमेलनातले भाषण

साहित्य संमेलनाची तुलना पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकीशी केली जाते. संमेलनाला येणारा समाज सामान्य मराठी माणसांचा असतो आणि साहित्य व साहित्यिकांविषयीच्या काहीशा भक्तिभावाने आलेला असतो, हे त्या तुलनेत मुख्यतः सुचवायचे असते. अध्यक्षीय भाषण हे त्या सामान्य मराठी माणसांशी मायमराठीत केलेले बोलणे असते. इंदूर संमेलनातील अध्यक्षीय भाषणातली काही वाक्ये या संदर्भात पाहावीत :

१. कोणीतरी म्हटले आहे,"True paradises are those which the writer has lost" पण ते गमावलेले स्वर्गही लेखकाच्या मनात वस्ती करून असतात.

--'कोणीतरी'च म्हटलेले इंग्रजीत कशाला सांगायचे ? ते मराठीतच सांगितल्यासारखा त्याचा संदर्भ पुढल्या वाक्यात घेतला आहे, तो इंग्रजी न जाणणाराला कळणार नाही.

२. ती सत्य सांगण्याची नशाच असते.काम्यूने म्हटले आहे,"Liberty is the right not to lie".लेखक सत्य सांगण्याचा अधिकार जितका जतन करतो तितके त्या अधिकाराचे समाजात अधिकाधिक दान होत असते.

-- काम्यू हे नाव सामान्य मराठी माणसाला किती आवाहन करू शकेल ? 'फ्रान्सच्या स्वातंत्र्यचळवळीतला साहित्यिक' एवढी तरी ओळख करून दिली तर त्याच्या स्वातंत्र्यविषयक वचनाला वजन प्राप्त होते. त्या वचनात 'असत्य न सांगण्या'वर जोर आहे तो 'सत्य सांगण्या'च्या उल्लेखात व्यक्त होत नाही. मराठीत अनुवाद करताना या खाचाखोचा लक्षात आल्या असत्या.

३. लेखक आहे म्हणूनच वाचकही आहे. त्या लेखकाला कसे नष्ट करणार ? 'The author is dead' हे रोलाँ बार्त्सचे प्रख्यात घोषवाक्य कसे मान्य करणार ?

--हे इंग्रजी घोषवाक्य आणि ते सांगणारा, दोघेही मराठी वाचकांत खासच प्रख्यात नाहीत. ते सांगण्याचा अट्टाहास कशाला?

४. प्रख्यात समीक्षक Hans Robert Jauss याने म्हटल्याप्रमाणे वाचकाचे एक 'अपेक्षा-क्षितिज' असते (Horizon of expectations)

--एका सामान्य विधानासाठी लेखकाचे नाव, तेही रोमन लिपीत देण्याची गरज नव्हती. 'अपेक्षा-क्षितिज'चे रोमन इंग्रजी देण्याचीही गरज नव्हती.

५. या मानसिकतेचा केंद्रस्वर जॉन ऑस्बोर्नच्या एका गाजलेल्या नाटकाचे शीर्षक वापरून बोलायचे झाल्यास Look back in anger हा आहे....पण म्हणून पुढे पाहतानाही मनात प्रक्षोभच असावा का? look forward in anger असेही म्हणायचे का? प्रक्षोभ (anger) ही अशी एक सार्वकालीन वाङ्मयीन प्रेरणा नसते. ...हॅरॉल्ड ब्लूम या समीक्षकाने तर याला

'प्रभावचिंता'च (anxiety of influence) म्हटले आहे.

--एकच प्याला, मानापमान या नावांसारखे अर्थवाहन इंग्रजी नाटकाच्या नावाने कसे होईल? त्या नावावरचा आणखी श्लेष किंवा प्रभावचिंता म्हणजे नेमके काय हे मराठी माणसाला कळेल का? इंग्रजी प्रयोग करताना हे भान ठेवले पाहिजे.

६. या भाषणांतून काही तत्कालीन प्रवृत्तीही अधोरेखित झाल्या. त्यात 'अव्यवस्थितप्रज्ञां'च्या इंग्रजीच्या अर्धवट, अपरिपक्व संपर्कामुळे निर्माण झालेली, गोंधळलेली प्रवृत्ती ..यांचा वेध इतका सूक्ष्मपणे घेतला होता..

--या उताऱ्यात पूर्वीच्या अध्यक्षीय भाषणांचा आढावा घेतला आहे. त्यातले विधान वरच्याही काही अवतरणांना लागू पडू शकेल. कुठलेही बाहेरचे विचार मराठीतच व्यक्त करायचे असे लेखक-वक्त्यांनी ठरवले तरच वाचक-श्रोत्यांना व्यवस्थितप्रज्ञेचा आणि बिनगोंधळाच्या प्रवृत्तीचा अनुभव येईल.

## १.३ : समीक्षाग्रंथ

संमेलनातले भाषण समीक्षेला वाहिलेले नसते. तशा वाहिलेल्या समीक्षा-ग्रंथात इंग्रजीतले संदर्भ काहीसे हक्कानेच अवतरतात. 'साहित्याचे नवीन भाषातत्त्वज्ञान' (वि. ना. ढवळे, कॉन्टिनेन्टल १९९७) हे पुस्तक अत्याधुनिक पाश्चात्य साहित्यविचारांचा परिचय करून देण्यासाठीच लिहिले आहे. त्यातले या उताऱ्यांबद्दलचे धोरण असे सांगितले आहे :

> सध्याची कागदटंचाई लक्षात घेऊन पृष्ठसंख्या वाढू नये याची काळजी घेतली आहे. म्हणून इंग्रजी व संस्कृत या भाषांतील वाक्यांचे पुष्कळदा भाषांतर दिले नाही.

हे धोरण पटण्यासारखे नाही. लेखकांची नावे, परिभाषाशब्द वगैरे सुटे शब्द आणि संदर्भग्रंथांच्या याद्या सोडून, मराठी मजकुराच्या पोटात आलेला इंग्रजी अवतरणांचा मजकूर १७३ पैकी दहा पृष्ठांच्या मानाने आहे. अगदी कागदटंचाईचा व्यावहारिक मुद्दा घेतला तरी असे म्हणता येईल की, मूळ उतारे न देता नुसते मराठी अनुवाद दिले असते तर पृष्ठसंख्या वाढली नसती; मराठी अनुवादाला तुलनेने जागा कमी लागत असल्याने, कदाचित एकदोनने कमीच झाली असती.

खरा कळीचा मुद्दा आहे तो कळवणुकीचा. आजच्या मराठी अभ्यासकाने 'मूळ विचारांची पार्श्वभूमी समजून घेणे महत्त्वाचे आहे ' हे ग्रंथकारांचे म्हणणे योग्य आहे. पण त्यांनीच मूळ विचारस्त्रोतांसंबंधी म्हटले आहे :

> जवळजवळ सर्व भाषाचिकित्सा मुख्यतः फ्रेंच मध्ये आहे..इंग्रजी पुष्कळ पुस्तकांचे भाषांतर हल्ली मिळू शकते. पण नवीन फ्रेंच लेखकांचे लेखन गूढ संकल्पनांचा मधून मधून उपयोग करून क्लिष्टता व गूढतेचे वातावरण निर्माण करते..
>
> गूढतेचे वलय फक्त सामान्य वाचकालाच जाणवते असे नसून सर्व नवीन उपपत्तींकडे अत्यंत सहानुभूतीने पहाणारे विद्वान सुद्धा 'तत्त्वज्ञानाचा उद्देश गूढता कमी करणे (Demystification) हा राहिला नसून फक्त Mystification चे प्रकार वाढवणे हा आहे' असे मानू लागले आहेत.

असले गूढ विचार मूळ इंग्रजीतल्या त्रोटक अवतरणांमधे वाचून त्यांचे आकलन करून घेण्याइतकी तयारी दुपदवीधर मराठी अभ्यासकांची सुद्धा नसते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दोन प्रकारचे परिणाम संभवतात. एकतर इंग्रजीतले विचार चुकीचे समजून घेतले जातील आणि त्यांच्या करवी चुकीचे प्रसृत होतील. किंवा ग्रंथाचे वाचकही ही आयती अवतरणे पेरूनच आपली लेखन-भाषणे सजवतील आणि अज्ञानप्रसार चालू राहील. उलट, इंग्रजीच्या साऱ्या खाचाखोचा जाणणाऱ्या, ग्रंथकारांसारख्या अधिकारी व्यक्तीने त्यांच्या ओघवत्या भाषेत या विचारांचा नुसता अनुवाद दिला असता तर एका निखळ मराठी संदर्भग्रंथाची भर समीक्षासाहित्यात पडली असती.

पुढील दोन उदाहरणे समीक्षेशी साक्षात संबंधित नाहीत. तरी त्यांचा अर्थ सहज कसा कळणार नाही आणि त्यांचा अनुवाद करणे कसे कठीण आहे हे लक्षात येईल :

> १. म्हणूनच सर्व क्षेत्रांत आपले मत स्पष्टपणे मांडणे आवश्यक असले तरी आग्रह निरुपयोगी ठरतो. रसेल याने पुढील धोक्याची सूचना सर्व विचारवंतांना दिली आहे.
>
> 'Whatever you think is going to happen ten years hence, unless it is something like the sun rising

tomorrow that has nothing to do with human relations, you are almost sure to be wrong'

-- "मानवी संबंधांशी काही देणेघेणे नसलेले 'उद्या सूर्य उगवणार आहे' यासारखे विधान. सोडून, दहा वर्षांनी काय घडायचे आहे याविषयी तुम्ही काहीही विचार केलात तर तुम्ही बहुधा नक्कीच चुकणार आहांत " असे काहीसे याचे शब्दशः भाषांतर होईल. अर्थाला बाध न आणता, गौण वाक्यांच्या जागा बदलून, एकाहून अधिक वाक्ये करून किंवा अन्य प्रकारांनी ते कसे सुलभ करता येईल हे लेखकाच्या मर्जीवर आणि रुचीवर अवलंबून राहील.

२. गॅडॅमरला आजही धार्मिक चर्चेत (Theology) महत्त्वाचे स्थान आहे. पण त्याने सर्वसाधारण आशय कसा ठरतो व ठरवावा याचीही चर्चा केली आहे.

'Gadamer who is interested in understanding as such and not simply in Biblical exegesis, regards conversation as a paradigm model for analysing the process of understanding.'

-- या उताऱ्यात 'आकलन, बायबलवर भाष्य, संवाद, विचारघाट' या विशेष संकल्पना आलेल्या आहेत. ग्रंथात याच्यापुढे 'संवादात जसा विचारविनिमय होऊ शकतो तसा लेखन वाचतांनाही करण्याचा प्रयत्न हवा' असे वाक्य आहे. त्यातून या उताऱ्याचा सगळा आशय लाभत नाही.

असली मूळ अवतरणे इंग्रजीत, रोमन लिपीत दिल्यावर सुटे शब्दही सहजगत्या तसेच लिहिले गेले आणि पुस्तक नागरी-रोमन मिश्र छपाईचे झाले. कोणते सुटे शब्द रोमन लिपीत कसे द्यायचे याचाही काही नियम नाही. उदाहरणार्थ,

त्यात 'तत्त्वे' (Principles) किंवा इतर जग

-- साध्या मराठी शब्दाला रोमन इंग्रजी प्रतिशब्द.

गूढता कमी करणे (Demystification)... Mystification वाढवणे..

-- एक शब्द कंसात मराठी पर्यायानंतर तर त्याच्या विरुद्ध अर्थाचा फक्त रोमन इंग्रजीत आला आहे.

राजाचा वध (Charles I)

-- कंसातल्या इंग्रजी नावाचा संदर्भ वाचकाला जुळवावा लागेल.

क्रॉम्वेलनंतर लगेच (1660)

-- सनाचा आकडा कंसात इंग्रजीत.

कलर (Culler) या समीक्षकाने; पण एका तत्त्वज्ञाने (John SEARLE); ..ब्लूम (HAROLD BLOOM)

--इंग्रजी व्यक्तिनामे देताना लहान-मोठी रोमन अक्षरे टाकण्यात सूत्र नाही;

या स्वरूपातली छपाई डोळ्यांनासुद्धा सुखद वाटत नाही. वाचकाच्या आशयग्रहणात उणीव राहते ती वेगळीच. तो आशय वाचकापर्यंत पोचण्यात तर लेखनाची इतिकर्तव्यता असते. ती व्हावी म्हणून, लेखकांनी या गोष्टी बारीकसारीक आहेत असे मानून त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये.

## १.४ : फुटकळ भाषांतरे

प्रस्तुतची चर्चा भाषांतर, अनुवाद, अनुसर्जन इत्यादींच्या चर्चेचा एक भाग आहे. भाषांतर इ. विषयांची चर्चा सामान्यतः लेख किंवा पुस्तक यांसारख्या विस्तृत संहितांच्या बाबतीत होत असते. चांगले भाषांतर होण्याकरण्यासाठी मग अनेक प्रकारच्या भाषाविशेषांचे विवेचन होते. परभाषेतल्या शब्द-अर्थ-वाक्यरचना-वाग्विशेष यांचा बऱ्याच वरच्या पातळीवर विचार होतो. प्रत्यक्षात असे विस्तृत भाषांतर करणाराची लेखापुरती किंवा पुस्तकापुरती काही लय बसून जाते आणि भाषांतरात काहीतरी बरीवाईट सुसंगती राहत असते. अशा भाषांतरकाचे विषयाचे ज्ञान सखोल असावेच लागते; त्यामुळे शब्दयोजना अधिक चपखल होऊ शकते.

स्वतंत्र मराठी लेखात किंवा पुस्तकात, त्या किंवा इतर संबंधित विषयातले इंग्रजी किंवा अन्य भाषांतील चारदोन शब्दांचे उल्लेख, किंवा विविध वाक्यांशांची व वाक्यांची अवतरणे विखुरलेल्या रूपात येतात तेव्हा अशी सुसंगती, लय किंवा चपखलता सहजसाध्य नसते. शिवाय अशा लेखा-पुस्तकाचा वाचक बहुधा केवळ मराठी जाणणारा असण्याचा संभव जास्ती असतो. त्यामुळे अशा फुटकळ इंग्रजीची भाषांतरे करताना लेखकाने

अधिक काळजी घेतली पाहिजे.

दुसरे असे की, मागच्यांपुढच्या मराठी विवेचनापेक्षा काहीतरी विशेष आशय सांगण्यासाठीच लेखक ही फुटकळ अवतरणे देत असतो. त्यामुळे अवतरणांची भाषा आणि आशय या दोहोंचेही काही खास विशेष असतातच. ते भाषांतरात उतरले तर पाहिजेत आणि तरी आजूबाजूच्या मराठी मजकुराशी सहज मिळून गेले पाहिजेत

इतकी सगळी कसरत मराठी लेखकाला करावी लागते किंवा त्याने केली पाहिजे. यामुळे मराठी लेखनाच्या पोटातल्या या फुटकळ भाषांतरांचे काम वरवर वाटते तितके सोपे मानू नये.

## १.५ : विधायक विचाराची वाट

वरच्या तीन विभागांत दिलेली उदाहरणे आणि त्यांजवरील टिप्पणी यांच्या अनुरोधाने या संदर्भात पुढील विधायक सूचना केल्या आहेत :

१. मराठी लेखन नागरी लिपीतच करायचे आहे अशी खूणगाठ लेखकाने मनाशी बांधली पाहिजे. इंग्रजी पुस्तकांमध्ये संस्कृत अवतरणेसुद्धा खुणांकित रोमन लिपीत दिली जातात. नागरी लिपीत इंग्रजी शब्दांचे लेखन करण्यात तितक्या अधिक खुणांची तरी जरूरी नसते. म्हणून मराठी लेख नावे, शब्द, उद्धृते धरून, सुरवातीपासून शेवटापर्यंत नागरी लिपीतच लिहिला जावा.

२. नागरी लिपीत परभाषेतला शब्द उच्चारानुसारच लिहिला जाईल. मूळ भाषा बोलणारांचे सुद्धा उच्चार सर्वत्र सारखे नसतात. त्यामुळे इंग्रजी शब्दांचे मराठी मुलखात जसे उच्चार होतात तसेच लिहावे. ऑफ चे अव्ह, जोन्स चे जोन्झ करायला नको. अनेक पाश्चात्य भाषांतले उच्चार स्पेलिंगप्रमाणे नसतात. त्यांतले खास महत्त्वाचे शब्द, विशेषनामे, ग्रंथनामे वगैरे लेखांती टीपांमध्ये रोमन लिपीत द्यावीत.

भारतीय भाषांतले अनेक शब्द आणि नावे त्यांच्या इंग्रजी स्पेलिंगवरून मराठीत उतरली जातात. त्यामुळे ते शब्द आणि नावे पुष्कळदा मूळ भाषेतील रूपापासून पार दूर गेलेली असतात. बंगाली राय मराठीत आर-ए-वाय रे किंवा आर-ओ-वाय रॉय होऊन येतात. तमिळ ळ साठी झेड-एच आणि त द

साठी टी-एच वापरले जात असल्यामुळे कळहम्, शांति यांचे मराठीत कझगम, सान्थी होतात. गुप्ता, सिन्हा यांचा अन्त्य आ स्पेलिंगमुळेच येतो. परिणामी पुष्कळदा भाषांमध्ये फार मोठे भेद असल्याची भावना होते. ती टाळण्यासाठी आणि अचूकतेसाठी, अशा शब्दांचे उच्चार मूळ भारतीय भाषेतून घ्यावेत.

३. मराठी लेखनात मुळातल्या उताऱ्यांचे मराठी अनुवादच द्यावेत. संदर्भ-टीपांमध्ये लेखाचा वा ग्रंथाचा नावपत्ता देऊन भागत नाही असे वाटले तर मात्र तेथे मूळ उताराही रोमन लिपीत द्यावा.

४. उद्धृत केलेली व्यक्ती त्या भाषेत प्रख्यात असली तरी मराठी वाचकासाठी तिच्या परिचयादाखल दोनचार शब्द लिहिणे जरूर आहे.

५. मराठीत चांगलेच रूढ झालेले इंग्रजी (म्हणजे मराठीच झालेले) शब्द तसेच वापरावेत. नवीन संकल्पनेचा इंग्रजी शब्द सोपा असला तरच नागरी रूपात घ्यावा. मात्र तो घेताना मराठी वाक्यात त्याचे लिंग काय असेल याचा विचार आणि त्याची निश्चिती तेथेच केली पाहिजे.

६. नवीन किंवा अनोळखी संकल्पनेच्या शब्दाचा अनुवाद एकाच मराठी शब्दाने केला पाहिजे असे नाही. स्पष्टीकरणाला अधिक शब्दही द्यावेत.

७. विशिष्ट अर्थाच्या किंवा परिभाषेच्या शब्दासाठी नवा शब्द बनवला तर मूळचा इंग्रजी शब्द पुढे कंसात न देता टीपांमध्ये त्याचे स्पष्टीकरण द्यावे.

८. नवीन शब्द संस्कृतवरून काढला असल्यास त्याची फोड कंसात द्यावी.

९. मराठी शब्द, वाक्प्रयोग किंवा वाक्य स्पष्ट करण्यासाठी इंग्रजीचा वापर निश्चयाने टाळावा.

१०. बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून मे पु रेगे यांच्यापर्यंत अनेकांनी इंग्रजीतला अवघड विचारही निर्मळ मराठीत आणला आहे, त्यांना वाट पुसावी.

<><><>

# २

# 'सत्यकथे'तील 'कम्युनिकेशन'

[ मूळ लेख : *सत्यकथा* एप्रिल १९७८ ]

<>

'सत्यकथे'च्या ऑक्टोबर १९७७ अंकातले ललित लेख आणि ललित-लेख-समीक्षा वाचल्या. गोड चेहऱ्यावर आवाळू, कंबुग्रीवेवर गॉयटरची फुगारी, किंवा नितळ अंगावर बॉइल्स उठलेले दिसावेत तसे वाटले ते वाचताना. "'पहाटपाणी'च्या निमित्ताने"मध्ये मिसेस मीना गोखले यांची समतोल समीक्षा लिहिण्याची शक्ती (पोटेन्शिॲलिटी) जाणवत असली तरी विचाराचे कॉम्युनिकेशन पुरेसे करण्यासाठी मराठी शब्दापुढे कंसात त्यांना इंग्रजी शब्द मांडावा लागतो, या नॉन-कॉम्युनिकेशनमध्ये केवढी भयाणता अनुभवाला येते!

प्रभाकर नारायण परांजपे यांच्या 'रवींद्र पिंगे यांची तीन पुस्तके'या लेखातून प्रोजेक्ट झालेल्या व्यक्तिमत्त्वाला इंग्रजी शब्दांच्याविषयी 'ऑब्सेशन' म्हणता येईल इतकी ओढ वाटते. साहजिकच त्यांच्या मराठी शब्दांमधला विचार अप्रत्यक्ष (सेकंडहॅंड) भासतो.

मिस्टर नरेश कवडी एस्क्वायर यांच्या समीक्षेतील ("'स्मरणगाथे'तील वास्तव आणि अ-वास्तव") सबस्टन्सचे व्हर्बलायझेशन इंग्लिशशिवाय पुरे होत नाही. कधीकधी संस्कृत किंवा मराठीची त्यांची स्मृती जागी होऊन 'सौंदर्यीकरण'सारखा 'ओशक्लिवी' शब्द त्यांना सुचवते. पण ती वास्तव स्मृती नसून रिट्रॉस्पेक्टिव्ह व्हिजनने गहिवरासाठी इन्व्हेंट केलेली एम्बेलिशमेंट असते

हे निकटवर्ती कंसाच्या बाहुपाशात पहुडलेल्या आंग्लवंशी एम्बेलिशमेंटवरून उघड होते. त्यामुळे ह्या इंटरेस्टिंग समीक्षेचा विचारगर्भ इंग्रजी असावा,हे फिक्शन इज मोअर ब्यूटिफुल दॅन द फॅक्ट, की हा लेख मराठी आहे. एरवी, त्यांना चांगले मराठी भाषांतर करता येतेच की! पण इंग्रजी शब्दांच्या अभावी मराठी लेखन कवडीमोल होईल अशी त्यांना भीती असावी.

दोन[2] विनय हर्डीकर ('आवडलेली माणसे')यांचा अत्यंत पारदर्शक किंवा बराचसा इन्व्हॉल्व्ह्ड परिचय करून द्यायचा झाला तरी असे म्हणावे लागेल की व्यक्तिचित्रात गुंतागुंती (कॉम्प्लेक्सिटीज्) नाहीत असेही नाही. तरी शैलीमुले एक लीनिॲरिटी सतत जाणवत राहते ती ही की योग्य (रेलेव्हंट) असो नसो, इंग्रजी शब्द मधेमधे पेरायचे. ते मराठीत लिहितात हा केवळ त्यांचा विनय वाटतो.

किस्सा[3] पद्मजा फाटक यांचे 'एक फेलाईन मी' हे वाचल्यावर, स्त्रिया प्रासादिक मराठी लिहीत असत हे आपले नोस्टाल्जिक मूडमध्ये आठवायचे. त्यातून निघते ते आपलेच लॉस्ट वाटणे वगैरे. पण रिलॅऽऽक्स्ड वाटण्यसाठी माणसे तुटायला हवी तर भाषाही तुटली पाहिजे --त्यासाठी हे रिस्क पत्करायलाच हवे. तरच कुठे जॉय ऑफ एक्झिस्टन्स हाती येणार! ज्ञानदेव-मुक्ताबाईंनी भले रत्नप्रासाद उभारले असतील इये मराठीचिये नगरी. तिला माय स्वीट सिटी वुइथ ड्रीमिंग स्पायर्स अशा शब्दांनी कुरवाळणे ही केवळ फेलाइन इंस्टिंक्ट. तिच्याकडे 'ऑफ्ली युवर्स' नजरेने पाहायचे तर इंग्लिश मेकच्या कोटेबल कोटाच्या खिशात हात घालून इंग्रजीच्या फाटकातूनच बघायला हवे!

गोस्पोदा[4] अंजली बिनीवाले यांच्याही 'चर्चबेल'वरील लेखातल्या इंग्रजी शब्दांचा सिग्निफिकन्स कळू शकत नाही. ते त्यांचे फक्त स्टॉक रिस्पॉन्सेस दिसतात. आणि ते आशयाला, शैलीला कशालाही मिळू शकतात. ग्रेस यांच्या प्रतिमांबद्दल त्यांनी जे लिहिले आहे ते सारे त्यांच्या या शब्दांना लागू पडते. ते मग वाईट अर्थाने रोमँटिक वाटतात. आमच्या बिनीवाल्या लेखकांची भाषेशी एक लव्ह-हेट रिलेशनशिप आहे. मराठी लिहिण्याचे लव्ह आहे, पण विचार इंग्रजीतून उचलल्यामुळे मराठी शब्दांबद्दल हेट आहे.

हे लेडी आणि जंटलमन लोक, दहावी नापास होऊन आपल्या इंग्रजीचे प्रदर्शन करणाऱ्या खेडवळासारखे, इंग्रजी शब्द आपल्या लेखनात का पेरीत असतात? का इंग्रजी शब्दांचे खोटे दागिने अंगभर मढवून विचारांचे दारिद्र्य झाकण्याचा हा प्रयत्न आहे? अन अगदी विश्वाच्या बेंबीशी भिडणारा विचार यांना सुचत असला आणि तो एका मराठी शब्दात गवसत नसला तर थोडे थांबून, एकदोन वाक्यांमध्ये तो स्पष्ट करायला काय अडचण आहे?

लिहिणारे लिहोत. संपादक 'तिरंगी'ऐवजी 'निरंगी' असल्या किरकोळ मुद्राराक्षसांची शुद्धी आवर्जून छापतात त्यांना ही विद्रूप आंग्लशूद्र भाषा कशी चालते? हे भयानक आणि ओंगळवाणे शब्दराक्षस कापले पाहिजेत असे त्यांना वाटत नाही काय?

------------

१ 'ओश्क्लिवी' हा 'अग्ली' या इंग्रजी शब्दाचा झेक प्रतिशब्द आहे.

२ 'दोन' या स्पॅनिश शब्दाचा इंग्रजी पर्याय 'मिस्टर'.

३ 'किस्सा' (फिनिश) = 'कॅट'(इंग्रजी) = 'फेलिस'(लॅटिन).

४ 'लेडी' या अर्थाचा सर्बियन-क्रोशियन शब्द.

<><><>

# ३

# भाषांतर आणि भाषाशुद्धी

[*मूळ लेख* 'पोटात एक, ओठात एक' : *माणूस* जून १९६५]

<>

*माणूस*च्या १५ मार्च १९६५ च्या अंकात, *भिंतीला तुंबड्या* या सदरात श्री. सुधाकर राजे यांनी राजधानीतील हिंदीचे नमुने दिले आहेत. 'समय' म्हणजे 'टाईम' आणि 'वक्त' असे दोन अर्थ क्रमिक पुस्तकात आढळतात, हा एक नमुना त्यांत दिला आहे.

तसे पाहिले तर हा केवळ 'हिंदी' विनोदाचा मासला नसून 'क्रमिक' विनोदाचाही मासला म्हटला पाहिजे. क्रमिक पुस्तके किती विनोदी असतात याचा वस्तुपाठ 'मऱ्हाटीचिये नगरी'सुद्धा मिळालाच आहे. तेव्हा हिंदी-वाल्यांनाच हसायला नको. शब्दार्थाच्या बाबतीत आपण मागे आहोंत असेही नाही. 'खोंड' म्हणजे. 'गाईचे पुल्लिंगी वासरू' हा अर्थ एका 'बाळबोध' पुस्तकातला आहे. त्याची सर 'मुख्याध्यापिका = हेडमिस्ट्रेस'ला येत नाही.

पण हा विनोदाचा पडदा जरा दूर केला तर जे भयावह रूप दिसते त्याचा जरा गंभीरपणे विचार केला पाहिजे. असले प्रकार अवलक्षणीच आहेत काय? असल्यास का होतात? -या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

क्रमिक पुस्तकांत आणि एकूणच शिक्षणक्रमात, 'ज्ञातातून अज्ञाताकडे' हे सूत्र असते. भाषेच्या अभ्यासात, नवीनच आलेल्या कठीण शब्दांचा अर्थ आधी

माहीत असलेल्या सोप्या शब्दांत दिलेला असतो. वर जी उदाहरणे दिली आहेत त्यांत अनर्थकारी अर्थ दिले आहेत असे घटकाभर मानले तरी, कठीण शब्दांचा अर्थ सोप्या शब्दांत दिला आहे काय? थोड्या विचारांती दिसेल की, या प्रश्नाचे उत्तर 'होय' आहे. धक्का देणारे तरी सत्य आहे.

'समय' हा शब्द हिंदी बोलभाषेतला नाही. हिंदीभाषी कुटुंबीय बोलताना 'वक्त' किंवा 'टाईम' हाच शब्द वापरीत असतो. उर्दू (फारसी) आणि इंग्रजी शब्द म्हणजे भाषेवरचा कलंक असे मानणाऱ्या शुद्धिवाद्यांनी 'समया'पुढे समया पाजळत ठेवल्या आहेत. सामान्य हिंदी कुटुंबातील मूल ज्या परिस्थितीत वाढते तिच्यात वेळेला वख्त किंवा टाइमच म्हणतात. म्हणून समय हा शब्द त्याला प्रथम अडतो तेव्हा त्याचा पर्याय या दोहोंतच त्याला सापडेल. 'मुख्याध्यापिका' ही फक्त कागदावर पुजायची सरस्वती आहे. दिवसाकाठी आठ घंटे शाळा चालवणारी मास्तरीण 'हेडमिस्ट्रेस' म्हणूनच ओळखली जाते. जिभेला आढे दोन्हींतही सारखेच, पण हेडमिस्ट्रेस जिभेवर जास्त सहज नाचते खरी!

'खोंडा'ची पाणिनीय व्याख्या देणारालाही क्षमा केली पाहिजे. खेड्यापाड्यात राहणाऱ्या विद्यार्थ्याला खोंड हा शब्द मुळी अडतच नाही. शहरात राहणाऱ्याला तो अडेल. त्याला खोंड म्हणजे नुसता छोटा बैल नव्हे हे कळले तर पाहिजे! अशीच काही भलीबुरी व्यख्या केल्याशिवाय त्याची समजूत पटणार नाही.

आता लक्षात येईल की, या मुलखावेगळ्या भाषा-अशुद्धीचे कारण तारतम्यरहित भाषाशुद्धी हे आहे. शब्द इंग्रजी किंवा फारसी आहे ना, मग त्याचे नावसुद्धा घ्यायचे नाही, त्याच्यातल्या कल्पनेला भरल्या पंक्तीतून हाकून लावायचे आणि संस्कृताचे तीर्थोदक शिंपून मगच घरात घ्यायचे या कर्मठ भाषाशुद्धीमधून असली विचित्रे जन्माला येतात. सामान्य जन टाईम, टाईम-शीर, बेटाईम असले शब्द वापरीत असले तरी आम्ही 'समय'च म्हणणार. प्रा. राजाध्यक्षांनी लिहिल्याप्रमाणे, बोलताना 'स्टॅटिस्टिक्स' म्हटलं तर चालतं, पण लिहिताना संख्याशास्त्रच म्हणायला पाहिजे. असला दुटप्पीपणा येतो तेव्हा

ग्रंथभाषा बोलभाषेहून पार निराळी होते. तुपाला 'तुंप' म्हटले म्हणजे आपण 'संव्सक्रुतान्त' बोलतो असे रांगड्याला वाटते, तसाच प्रकार व्यत्यासाने या शुद्धिवाद्यांच्या बाबतीत होत असतो.

### विद्वान काय करतात

पण बिचाऱ्या शालेय पुस्तककारांवर घसरून काय उपयोग? त्यांचे ज्ञान तोटके, आणि ते तोटके आहे याची त्यांना जाणीवही असते. याउलट, आपल्या ज्ञानाची जाणीव असणारे विद्वान काय करतात तेही पाहणे मनोरंजक ठरेल.

देशी भाषांतील आम विद्वानांचे ठाम मत आहे की, वाचक म्हटला की त्याला इंग्रजी येत असलेच पाहिजे. अ. का. प्रियोळकर मराठीचें एवढे अभिमानी; *दादोबा पांडुरंग*च्या प्रस्तावनेत म्हणतात," या ग्रंथाचा वाचक निव्वळ मराठी जाणणारा असा बहुधा नसणारच, म्हणून इंग्रजी उताऱ्यांचे मराठी भाषांतर देता आले नाही तरी काही हरकत नाही"! आपल्या वाचकाला इंग्रजी येतेच आणि आपल्यासारखेच 'फाडफाड' येते असे गृहीत धरल्यावर मार्ग फार सोपा होतो. विचार इंग्रजीत करावा किंवा शक्यतोवर इंग्रजीतलाच उचलावा, मराठीत उतरावा; शब्द अडेल तिथे, डिमॉस्थेनिसच्या दाढेतल्या गोटीसारखा टणक संस्कृत शब्द मराठी म्हणून घालावा आणि शिवाय पवित्र रोमन लिपीत मुळातला इंग्रजी शब्दही लिहून दाखवावा. मराठी लेखनाचा अर्थ निश्चित करायला इंग्रजी फूटपट्टी वापरली पाहिजे. समयाला टाईम म्हणणारा नागरी लिपी तरी वापरतो. उच्च कोटीतला विद्वान Time म्हणून रोमन लिपीत लिहील. हे वैज्ञानिक लेखनाबद्दल लिहिलेले नाही, साहित्यसमीक्षा, तत्त्वविचार, राजकारण यांसारख्या मानवविद्यांवरील लेखनाबद्दलचे आहे. कृ.पां.कुलकर्णीसारख्या भाषापंडितांना **वस्तु** असे ठळक अक्षरात लिहून referent असे इंग्रजीही द्यावे लागते, किंवा टीकाकाराला 'घाट, पोत' असले शब्द वापरले की लागलीच कंसात pattern लिहावे लागते हे कशाचे लक्षण?

### भाषावृद्धीला भाषाशुद्धीची अडचण

परक्या भाषेतले, विशेषतः इंग्रजी आणि फारसी या एकेकाळच्या

आपल्या जेत्यांच्या भाषांतले शब्द फेकून त्यांच्या जागी संस्कृत किंवा स्वभाषेतले शब्द आणले की भाषा शुद्ध होते काय, या प्रश्नाची पुष्कळच चर्चा आजवर झालेली आहे. त्या वादात न शिरता, या शब्दशुद्धीचे जे ढोबळ कुपरिणाम होत आहेत त्यांच्याकडे मात्र आवर्जून पाहिले पाहिजे. तसे केल्यास भाषाशुद्धीची भाषावृद्धीला अडचण होणार नाही, किंबहुना भाषा अधिक संपन्न होईल.

शब्दांची भाषांतरे करण्यात भाषेचा विचार साकल्याने करण्याचा विसर पडतो अशी आजची अवस्था आहे. इंग्रजी शब्द घेतला की त्याच्याशी ज़वळच्या अर्थाचा संस्कृत शब्द बनवायचा अशी रीत आहे. यामधे, प्रत्येक शब्दाभोवती थोडे काव्यमय, थोडे परंपरेचे असे जे काही वलय असते, ते नष्ट होते. मुळातला शब्द सरळच घेतला, आणि त्यचे स्पष्टीकरण केले तर, त्याचे तरी ते वलय कायम राहील; पण नवा शब्द निव्वळ बाटगा असतो. त्याला परंपराही नसते आणि यंत्रात उत्पन्न झालेल्या कवितेप्रमाणे तो काव्यहीन असतो.

संस्कृत शब्द आपल्या भाषांमध्ये तत्सम आणि तद्भव अशा दोन्ही रूपांत येतात. एकाच संस्कृत शब्दातून आलेला तत्सम आणि तद्भव या शब्दांची जोडी घेतली तरी दोघांच्या अर्थछटा वेगळ्या आहेत याचा अनुभव येईल. 'प्रकट' आणि 'परखड' या दोघांचे मूळ एकच, पण दोघांच्या अर्थात सूक्ष्म भेद आहे. हा परंपरेचा परिणाम आहे. शब्दाभोवतीचे वलय म्हटले ते हेच. 'अवलाद'ला 'संतान' म्हणता येईल, पण तरीही दोघांच्या अर्थातली तफावत कायमच राहील. 'हिंदी ठीक आहे, पण काही म्हणा, उर्दू जास्ती जोरदार वाटते' असे उद्गार अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळतात यातले रहस्य हेच आहे.

म्हणून आपण नवीन शब्द तयार करतो तेव्हा 'जुन्याच्या जागी नवा' असा आग्रह न धरता, 'जुन्याच्या जोडीने नवा' असा लवचिकपणा स्वीकारला पाहिजे. म्हणजे मग नव्यानव्या अर्थछटा त्यांतून प्रकट होऊ लागतील, भाषेची शब्दसंपन्नता वाढेल आणि विचारवहनाचे सामर्थ्य उणे पडणार नाही. विकासासाठी परक्याचे कर्ज आणि स्वतःचे मुद्दल व कष्ट कामी येत असतात;

समाज हा नाना जातीजमातींनी, कुल-गोत्रांनी बनतो; तशी सर्वसमावेशक वृत्ती आपण या बाबतीत स्वीकारली पाहिजे. दुरभिमानातून उन्नती होणे कठीण आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे.

**उच्चार-विचारांची एकरूपता**

विचारवहन हे भाषेचे प्रधान ध्येय. उच्चार-शब्दांना प्रत्येक भाषेत काही व्यक्तित्व आहे आणि आपल्या भाषेत परभाषेतले विचार आणयचे तर, नुसत्या शब्दशुद्धीपेक्षा, भाषेची प्रकृती सांभाळून नवे रस, नवे शब्द तिच्यात ओतले पाहिजेत. याची जाणीव ठेवली नाही, तर आपण नुसते तर्जुमाबहाद्दर बनून राहू. इंग्रजी शब्दातलां विचार हे लक्ष्य, तेच लक्षात, मग नाइलाजाने मराठीत किंवा हिंदीत त्याचे रूपांतर करायचे, असला प्रकार राहता कामा नये. परभाषेतला विचार पचनी पाडून स्वभाषेच्या द्वारा मांडण्याची आच पाहिजे. त्यात एकेका शब्दाला दुय्यम स्थान आहे. असे केले तरच, सध्या चालू असलेला 'ओठात एक, पोटात एक' हा प्रकार बंद होईल आणि खरीखुरी संपन्न आणि प्रवाही भाषा आपल्याला मिळेल.

<><><>

# ४

# साहित्यसंस्थांच्या पदस्थांची अनास्था

<>

मराठी भाषा आधुनिक जगातील सदैव वाढत्या ज्ञानाचे समर्थ वाहन व्हायची असेल तर इंग्रजी भाषेतून बरेच काही घेणे आपल्याला गरजेचे आहे. ऐतिहासिक कारणांनी ते सोयीचेही आहे. ही घेवाण आजही तशी चालूच आहे पण तिचे स्वरूप विस्कळीत आहे. तिचा उपयोग मराठी भाषेच्या वाढीला आणि प्रगतीला व्हावा म्हणून लेखकांनी आणि साहित्यसंस्थांनी या व्यवहाराचे काही मार्गदर्शक नियम बसवले पाहिजेत. प्रकाशित साहित्यातली या प्रकारातली उदाहरणे घेऊन याविषयी काही सूचना करणारे लेख येथे संकलित केले आहेत.

त्यांतला 'मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार' या लेखाचा पहिला भाग महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या ३०३ क्रमांकाच्या (ऑक्टो.-डिसें २००२) अंकातील लेखांमधल्या उदाहरणांवर आधारलेला आहे. हा भाग म.सा.पत्रिकेच्याच ३०४ क्रमांकाच्या (जाने.-एप्रिल २००३) अंकामध्ये प्रसिद्ध झाला. संपादकांनीही त्यातल्या विधायक दृष्टीकडे विशेष लक्ष वेधले होते.

दुर्दैवाने त्याची अंक क्र. ३०४ मधली छपाई सदोष झाली होती म्हणून अंक मिळाल्यावर लगेच मी संपादक आणि कार्याध्यक्ष यांना लिहिलेल्या पत्राचा मुख्य भाग असा होता :

"पत्रिकेच्या ताज्या अंकात हा लेख छापल्याबद्दल आभारी आहे...

"छापलेल्या लेखात छपाईच्या किती चुका केल्या आहेत याची कल्पना सोबतच्या लेखप्रतीतील खुणांच्या जागांवरून येईल. चि. वि. जोशींच्या 'कंपॉझिटरचा सूड'ची आठवण झाली. काही ठळक बाबींचा उल्लेख करतो.

'शब्द' हा शब्द अनेक ठिकाणी 'शमब्द' असा छापला आहे.

'काळात - काळता, अशक्य - आक्य, येत्या - येत्यार, विशेष - विशाष, इंग्रजी - इंगअजी, नेंतृत्व - नैतृत्व, हेजिमनी - हेजिमनीर ' असल्या चुका का होतात ते कळत नाही.

लेखाची मूळप्रत संगणकावर छापलेली होती. छापील मूळप्रतीत परिच्छेदांची मांडणी, .. अशी चिन्हे ही सारी व्यवस्थित होती. कित्येक ठिकाणी या खास गोष्टींची हेळसांड झाली आहे.

"संगणकावर पत्रिकेच्या पृष्ठाकारात छापून दिलेल्या प्रतीवरून अक्षम्य म्हणण्याइतकी सदोष छपाई का आणि कशी झाली याची तपासणी होण्याची गरज आहे हे आपणांस मान्य व्हावे. आता तीन महिन्यांनी पुढल्या अंकात शुद्धिपत्र आणि औपचारिक दिलगिरी येईल (अशी किमान आशा आहे) पण लेखाची चव एकदा गेली ती काही भरून येणार नाही. आपण या संबंधात काय करणार आहांत?

"हा विदारक अनुभव पाठीशी असतांनाही, समीक्षाग्रंथांतले आणि संमेलनाध्यक्षीय भाषणांतले इंग्रजीचे अवतार या विषयी सुमारे सहासात पृष्ठांचा लेख मी लिहीत आहे तो एप्रिलअखेर आपल्याकडे येईल. त्याला पुढील अंकात शुद्ध छपाईने स्थान मिळावे.

या पत्राला कार्याध्यक्षांनी स्वहस्ते उत्तर लिहिले :

" मसापत्रिका अंक क्र. ३०४ मधील तुमच्या टिपणामधील मुद्रणाच्या भयंकर चुका पाहिल्या. पत्रिकेमध्ये असे काही व्हावे याची मलाच लाज

वाटली. चुका राहिल्या त्याबद्दल मी क्षमा मागतो.

"अक्षरजुळणी करणाऱ्या व्यक्तीला मी तपासलेल्या अखेरच्या मुद्रितासह बोलवून घेतले. त्याला बोलायला तोंडच नव्हते. "चुकून आधीचे प्रुफ मशीनवर गेले " असला काहीतरी खुलासा त्याने केला तो पटण्यासारखा नव्हता.

"मी जे अंतिम मुद्रितशोधन केले होते त्याची प्रत आपल्या अवलोकनासाठी येथे पाठवीत आहे. निदान मी आपले काम केले होते हे आपणांस पटेल अशी आशा आहे. हे समर्थन नव्हे. कोणाच्याही हातून चूक झाली तरी शेवटी कार्याध्यक्ष म्हणून माफी मागणे माझे कामच आहे."

या पत्रात शुद्धिपत्र, लेखाचा पुढचा भाग या आशयसंबंधित गोष्टींविषयी काहीही खुलासा नाही. या पत्राला मी उत्तर दिले :

"'मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार' या लेखाच्या छपाईविषयीचे तुमचे पत्र मिळाले. त्याबद्दल आभारी आहे.

"असे का झाले याची तपासणी व्हावी असे मला वाटले होते, ती तुम्ही केली आहेच. व्यक्तिशः माझी कोणी क्षमा मागावी असे मला कधीच वाटले नव्हते. त्या चुकांमुळे 'लेखाची चव गेली' ही माझी मुख्य आणि एकमेव खंत होती. पत्रिकेच्या वाचकांनाही ती वाटली असेल. लेखक आणि संपादक अंतिमतः वाचकांना जबाबदार असतात. त्यामुळे क्षमा वाचकांची मागितली पाहिजे.

"पुढल्या अंकात लांबलचक शुद्धिपत्र छापण्याऐवजी, संपादकीयात योग्य खुलासा करून, सबंध लेखच शुद्धरूपात पुन्हा छापला तर वाचकांना सोयीचे होईल. माझ्या पत्रात मी ज्या पुढच्या लेखाचा इसार दिला होता, तो भाग धरून हा विषय एकसंधपणे दहा पानांत पुरा होईल.

"असा सर्व विचार करून मी सोबत या पूर्ण लेखाची १० पृष्ठांची संगणक-मुद्रित प्रत पाठवीत आहे. तिचा छापील आकार मापाने पत्रिकेच्या छापील पृष्ठाएवढा ठेवला आहे. अंक क्रमांक, महिने आणि पृष्ठांक यांच्या

चिठ्ठ्या पानाच्या तळाशी चिकटवून ही प्रत छापखान्याला निगेटिव तयार करण्यासाठी देता येईल. मागच्यासारखी पुन्हा जुळणी करण्याची गरज पडणार नाही. याप्रमाणे मी सबंध पुस्तके छापून घेतली आहेत. त्यामुळे मुद्रक काही अडचणी सांगतील त्या ते सोडवू शकतात. नाहीतर, लेखाची पाने स्कॅन करून त्यांनी हवी ती कार्यवाही करावी. या प्रतीकडे पाहून पुन्हा जुळणी (डी टी पी वगैरे) मात्र कोणत्याही परिस्थितीत टाळावीत."

या पत्राला कार्याध्यक्षांचे उत्तर असे आले :

" आपले पत्र व टिपणे मिळाली. मुद्रणाच्या चुका झाल्या म्हणून तोच लेख पुन्हा छापणे शक्य होणार नाही. तसेच इतर टिपणेही *यथावकाश* प्रसिद्ध केली जातील. इतर बरेच साहित्य प्रकाशनार्थ, पडून आहे. तसदीबद्दल क्षमस्व."

या लेखाच्या आशयविषयांसंबंधी कार्याध्यक्षांना अगत्य नाही हे दिसून आल्यामुळे मी जे होईल ते पाहावे असा विचार करून उगी राहिलो. क्र. ३०५ च्या (एप्रिल-जून २००३) अंकामध्ये आला :

**" दिलगिरी व खुलासा**

"अंक क्र. - ३०४ मध्ये श्री. विश्वनाथ खैरे यांच्या 'मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार' या टिपणामध्ये मुद्रणाच्या असंख्य चुका राहिल्या, याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. वस्तुतः सर्व चुका दुरुस्त केलेले अंतिम मुद्रित पाहूनच छापण्याचा आदेश दिला होता. पण अक्षरजुळणीकाराने चुकांनी भरलेले मुद्रितच मुद्रणासाठी वापरले, हे अंक छापून आल्यावर जाणवले. त्या वेळी काही उपाययोजना करणे शक्य नव्हते. या अक्षरजुळणीकाराच्या बाबतीत आवश्यक ती उपाययोजना केली आहे.

"त्याचप्रमाणे याच पत्रिकेत पान ६७ वर नवीन देणगीदार या चौकटीत श्री प्रतापराव बेहेरे विश्वस्त यांच्या नावे रु.७५०/- ची देणगी नजर चुकीने छापली गेली असून सदर देणगी रु. ७,५००/- आहे."

छापलेल्या लेखातील चुकांची जाणीव लेखकाने करून द्यावी लागली होती. जाणीव झाली 'त्यावेळी काही उपाययोजना करणे शक्य नव्हते' तर दिलगिरीबरोबर निदान शुद्धिपत्र छापता आले असते. भाषेच्या स्वरूपासंबंधीच्या लेखातल्या चुका तशाच राहू दिल्या जातात, देणगीच्या रकमेची दुरुस्ती आवर्जून केली जाते. यावरून भाषाविषयक प्रश्नांबाबतची अनास्था दिसते.

जी उपाययोजना करणे शक्य होते तिची सगळी सामुग्रीही पुरवलेली होती. तिला प्रतिसाद म्हणून (भल्यामोठ्या शुद्धिपत्राऐवजी) तीनचार पृष्ठांचा लेख शुद्ध स्वरूपात 'पुन्हा छापणे शक्य होणार नाही' हे अधिकाराच्या तोऱ्यात सांगितले होते. त्या अधिकाराच्या जोरावरच 'अक्षरजुळणीकारावर आवश्यक ती कारवाई केली आहे' आणि भाषाविषयक लेखातले छपाईचे प्रमाद मात्र तसेच राहू दिले आहेत, हाही अनास्थेचाच प्रकार.

लेखाचा ('टिपणा'चा !) पुढचा भाग अंक ३०५ मध्ये नाहीच, ३०६ (जुलै-सप्टें २००३) मध्येही प्रसिद्ध झाला नाही. छपाईसाठी पडून असलेल्या विविध विषयांवरील साहित्याच्या रांगेत त्याचा नंबर *'यथावकाश'* केव्हा लागेल ते पहायचे. भाषेसंबंधी महत्त्वाच्या विषयाची तड लावावी असे कार्याध्यक्षांना वाटत नाही. चुका टाळण्यासाठी संगणकाने पदरात टाकलेल्या सोयींचा उपयोग करून घेण्याची त्यांची इच्छा नाही.

साहित्यसंस्थांच्या पदस्थांना जुळाऱ्यावरील कारवाईसारखी प्रशासकीय दंडविधाने अधिक महत्त्वाची वाटतात. त्यांची भाषाविकास, भाषाप्रदूषण इत्यादी विषयांवर व्याख्याने होत असतात. पण भाषाविकासासाठी कृती किंवा तपशिलाची चर्चा करण्याविषयी त्यांच्यांत अनास्था आहे.

भाषाव्यवहारातील इतर मराठीजनांनी त्याविषयी आस्था दाखवली तरच ही स्थिती बदलू शकेल.

<><><>

## विश्वनाथ खैरे

### नाटके

| | |
|---|---|
| पुलंच्या आवडीच्या ७५तील एक | एकलव्य |
| महाभारतीय स्त्रियांच्या मनोव्यथा | वंशाचा व्यास |
| विज्ञाननाटक | युरेका |
| शिवकालीन लोककथेचे एकनाट्य | हिरकनी |
| पुराणकथांच्या विमर्शाची नाटिका | घोड्यापुढं गीता |
| कर्णाची आई कुंती की राधा ? (संस्कृत) | का माता। |

### बालसाहित्य, प्रौढ भूमिकांसह

| | |
|---|---|
| विज्ञानयुगाची बाळगाणी | युगाणी |
| निरक्षरांना सहज साक्षर करणारे | अक्षरे |
| संस्कृतिसंगमाची | इमराठी गाणी |

### भाषा-संस्कृती संशोधन

| | |
|---|---|
| मराठी स्थळनामांची दक्षिणी उकल | द्रविड महाराष्ट्र |
| नवा भाषाशास्त्रीय विचार | मराठी भाषेचे मूळ |
| वाडवडलांच्या बोलीचालींचा मऱ्हाटी मागोवा | * अडगुलं मडगुलं |
| संस्कृतिकथांचा अनेकविद शोध | **** भारतीय मिथ्यांचा मागोवा |
| चमत्कारकथांच्या उगमाचा शोध | ज्ञानेश्वरांचे चमत्कार |
| वेदसूक्तांचा मराठमोळा अनुवाद | वेदातली गाणी |
| आशयलक्षी समीक्षा | साहित्य मिथ्य माहित्य |

* राज्य- आणि इतर साहित्य पुरस्कार

संमत प्रकाशन, ३७४ सिंध सोसायटी, औंध पुणे ४११००७

## १

## मराठी गद्यातले इंग्रजीचे अवतार

## २

## 'सत्यकथे'तील 'कम्युनिकेशन'

## ३

## भाषांतर आणि भाषाशुद्धी

## ४

## साहित्यसंस्थांच्या पदस्थांची अनास्था

संमत प्रकाशन
३७४ सिंध सोसायटी, औंध पुणे ४११००७
फोन : ०२०-५८८३१८७ email : vakhaire@vsnl.com